जा.क्रं.उमाशि-३/पुवि/उत्तरप. तपा./२०१३
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे -१ यांचे कार्यालय.
दिनांकः- - 8 MAR 2013

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे अहमदनगर सोलापूर

**विषय :** उच्च माध्यमिक परीक्षा फेब्रुवारी / मार्च २०१३ उत्तरपत्रिका मूल्यांकनाबाबत.

**संदर्भ :-** सचिव, राज्यमंडळ, पुणे ४ यांचे क्रमांक रा.म./परीक्षा-२/१८५५ दिनांक ७/३/२०१३ चा फॅक्स संदेश

महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटनेने त्यांच्या मागण्या संदर्भात फेब्रुवारी / मार्च २०१३ इयत्ता १२ वी परीक्षा व सदर परिक्षेच्या उत्तर पत्रिका मूल्यांकनाबाबत बहिष्कार टाकल्याने संघटनेच्या मागण्यांबाबत शासन स्तरावर चर्चा होवून विदयार्थ्यांचे हित त्यांचे महत्वाचे वर्ष तसेच दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार परीक्षेचे निकाल दिनांक ५ जून पूर्वी जाहिर करणे बंधनकारक असल्याने उत्तर पत्रिकांच्या मूल्यांकनावरील बहिष्कार मागे घेण्याची विनंती करण्यात आली. तथापि संघटनेने बहिष्कार मागे न घेण्याचा पवित्रा घेतला आहे.

त्यानुसार आपणास सूचित करण्यात येते की, आपल्या जिल्हयातील सर्व शाळा / कनिष्ठ मूख्याध्यापक /प्राचार्य तसेच संबंधित संस्थांच्या प्रमूखांना आपल्या स्तरावरुन तात्काळ कळविण्यात यावे की, परीक्षेच्या उत्तरपत्रिका तपासण्यासाठी त्यांच्या शाळा / कनिष्ठ महाविद्यालयातून नियुक्त करण्यात आलेले परिरक्षक / नियामक यांचेपैकी किती शिक्षक परिक्षण / नियमन करण्यास तयार आहेत किंवा नाहीत याची माहिती त्याचप्रमाणे जे शिक्षक उत्तरपत्रिका मूल्यांकनाचे कामास नकार देतील अशा शिक्षकांची नावानिशी व विषयाप्रमाणे यादी तयार करुन, ती यादी विभागीय मंडळास परस्पर सादर करावी व त्याची एक प्रत या कार्यालयास आपल्या मार्फत सादर करावी. अशा शिक्षकांविरुध्द महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील तरतुदीनुसार अशा मूल्यमापनाच्या महत्वाच्या कर्तव्यास नकार देणा-या शिक्षकांवर कारवाई करण्यासंदर्भात या कार्यालयास कळविण्यात यावे. सदर कारवाई करण्यास ज्या संस्था नकार देतील अथवा दिरंगाई करतील अशा संस्थांना शासनाकडून दिले जाणारे अनुदान रक्कम स्थगित केली जाईल याची सूचना दयावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल उलट टपाली सादर करावा. सदर परिपत्रक मा. कार्यालयाच्या www.dydepune.com संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे.

(बालासाहेब ओव्हाळ)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे १ करिता

प्रत - माहितीस्तव सविनय सादर,
१. मा. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ३२
२. मा. श्री आ. भ. रामटेके, अवर सचिव, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई ३२
३. मा. शिक्षण संचालक, (माध्यमिक) मध्यवर्ती इमारत, पुणे -१
४. सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे

letter